‘ अभ्युदय ’

माझे शब्दरंग.....

_@ अमोल K..

“ मनामध्ये विचारांची गर्दी झाली,
गर्दीला वाट देण्यास हातात लेखणी आली..
रसिक – वाचक मित्रहो तुम्ही दिलेल्या प्रेरणेतून,
"अभ्युदय" रूप काव्याची निर्मिती झाली ...”

कळावे ,

आपलाच लेखक–कवी मित्र :

प्रा .डॉ . अमोल भा. कस्तुरे

__ @अमोल K (अभ्युदय)

आशा....

मजबूत मन नेहमी “आशा”
करते
आणि
नेहमी “आशा” ठेवण्यासाठी
कारणीभूत पण असते..

__ @अमोल K (अभ्युदय)

तू समोर असता
तुला नखशिखांत पहावं,
तुझा एक कटाक्ष पडताच
तुझ्या डोळ्यात मनाला बुडवावं,
तू सुंदर स्मित देता
तुझ्या ओठावरील शब्द मी व्हावं,
तुझी केसांची बट झुळुकेने हलताच
माझ्या हातांनी ती हळुवार सरकावं,
तू मला भेटून निघताच मज वाटते कि
थांबवून तुला बाहुपाशात घट्ट आवळावं..

— @अमोल K (अभ्युदय)

एकदा ती माझ्याकडे आली

माझ्याबरोबर 'चल' म्हणाली,

'हो' म्हणायच्या आतंच

ती देऊन तिचा हात- घेऊनी मज

गेली....

__ @अमोल K (अभ्युदय)

सुंदर जीवन जगण्यासाठी
जिवंत असावं लागतं,
जिवंतपणी ध्येयाची आसक्ति
असणं महत्वाचं असतं..
ध्येयप्राप्तीसाठी यशस्वी
वाटचाल करणं गरजेचं असतं ,
, यशस्वी वाटचाल करता करता
"यश" मिळवणं तेजोमय असतं
!!!!

__ @अमोल K (अभ्युदय)

चिंब पावसात हि कस फुलावं..
हे नक्कीच मोगऱ्या कडून शिकावं

_ @अमोल K (अभ्युदय)

दुसरों के दुखों के प्रति तुम
होते हो सदा व्यथित ,
हमेशा तुमने दुसरों के लिए
किया है खुदको साबित ..
लफ़्ज़ों में तुम्हे कैसे बयान
करें ,
तुम तो हो सबके हृदय पर
"अंकित" !!!

__ @अमोल K (अभ्युदय)

कुणीतरी आपलं असावं,
ज्याच्या खांद्यावरती डोकं ठेऊन
ढसाढसा रडावं..
मन हलकं करून झाल्यावर,
शेष अश्रुरूपी दवं पापण्यांच्या आडून
कोणीतरी अलगद टिपावं !!!!

— @अमोल K (अभ्युदय)

असतो जेंव्हा धोका ,
एका कळीमध्ये घट्ट राहण्यासाठी..
त्यापेक्षाही अधिक वेदनादायक जोखीम असते ,
त्या कळीला फुलण्यासाठी ...

__ @अमोल K (अभ्युदय)

नेह्मी आज्ञा पाळावी गुरूंची,

तरच कळेल मह्ती ज्ञानाची ..

सदा शर्थ करावी प्रयत्नांची,

तेव्हांच मिळेल गुरुकिल्ली यशाची.

__ @अमोल K (अभ्युदय)

प्रेमात कधी पडलो नाही
आणि प्रेम कसं करावं समजलं
नाही ,
हे सत्य असले तरी मन मात्र
नेहमी हेच सांगत होत कि ...
अरे वेड्या तुझ्यावर कोणीतरी
प्रेम करत होत,
हेच तुझ्या मनाला कधी उमगलं
नाही..

__ @अमोल K (अभ्युदय)



कधी तरी मनाला विवंचना असावी,

या विचारात अश्रूंनी मार्गस्थ व्हावे..

मात्र विंवंचनेतून मुक्त होताना,

मनाला शब्दांनी स्फुरण द्यावे ..

__ @अमोल K (अभ्युदय)



जेंव्हा तुझी आठवण आली,
तेंव्हा तू मला स्वप्नातून भासली..
परंतु तू समोर दिसताक्षणी,
तुझी नजर माझ्या नजरेस लाजली ..

_ @अमोल K (अभ्युदय)

या बेधुंद बरसणाऱ्या चिंब पावसात,
तू मनसोक्त भिजून आली...
अन तुझ्या केसातुन ओघळणाऱ्या
थेंबांनी,
तुझ्यात दडलेल्या नखशिखांत
सौंदर्याची जाणीव करून दिली !!!!

— @अमोल K (अभ्युदय)

वैसे तो सुंदरता गेंदे के फूल में भी

होती है ,

लेकिन सम्मोहित करना तो कोई

गुलाब से सीखे ..

__ @अमोल K (अभ्युदय)

आज बहोत सालों के बाद मुझे
दिखी वो हँसी,
लेकिन उस हँसी में नही थी
शामिल मेरी ख़ुशी..
कहीं अरसों तेरी चाहत में बिखऱ
सी गयी थी मेरी जिंदगी,
कहीं फिर से ना जागे मेरी मुख़्तसर
आरज़ू यही है बंदगी.....

__ @अमोल K (अभ्युदय)

जीवनरूपी वही चाळताना सखे तुझी

आठवण आली,

आठवतंय काही ठिकाणीं नमुद केले

होते मी तुला..

पण अचानक तुला वगळून एका नवीन

परिच्छेदाची सुरुवात झाली!!!!

__@अमोल K (अभ्युदय)

तुम्हारा मुस्कुराना भी
मेरे लिये इक शौक था ,
लेकिन यह शौक पुरा होना
इक बेहद इत्तिफ़ाक़ था ...

— @अमोल

आज लेखणी उचलली खरी
कि वर्णावे तुझे सौंदर्य तरी ,
सौंदर्य तुझे शब्दांनी रेखाटावे या
विचाराने माझे मन ही झाले भारी..

— @अमोल K (अभ्युदय)

आज पुन्हा एकदा पावसाला
सुरुवात झाली ••••
काही आठवतंय तुला..
मागील पावसाळ्यात अपूर्ण
राहिलेल्या आपल्या कवितेच्या
जुगलबंदीला,
आज परत एकदा नव्याने
सुरुवात झाली .....

__@अमोल K (अभ्युदय)

असतो जेंव्हा धोका ,

एका कळीमध्ये घट्ट राहण्यासाठी..

त्यापेक्षाही अधिक वेदनादायक जोखीम असते ,

त्या कळीला फुलण्यासाठी ...

__ @अमोल K (अभ्युदय)



तू खूप सुंदर आहेस ..कबूल आहे !

तुझे स्मित खूप लाजाळू आहे ..कबूल आहे !

तुझे बोलणे मधुर आहे ..कबूल आहे !

तुझे केस मखमली आहेत ..कबूल आहे !

तुझे नयन बोलके आहेत ..कबूल आहे !

यांत मी खूप अबोल आहे,

असा तुझा आरोप आहे..

पण तुझे माझ्याकडे फक्त डोळ्यांनी पाहत राहणं,

याला मात्र माझा विरोध आहे ....

बाकी सर्व काही तुझ्यासाठी कबूल आहे !!!!!!!

— @अमोल K (अभ्युदय)

शब्द मी दिले
ओळ मी लिहली
शब्दात भाव ही मी ओतला
आणि कविता मात्र तु वाहून नेली

प्रा .डॉ . अमोल कस्तुरे
__ @अमोल K (अभ्युदय)

कधीही नकार देण्यास नाही
शिकलो ,
त्यामुळे जगण्यातील स्वाभिमान
भोगलो..
सतत स्वप्नांचा पाठलाग करत
ध्येयप्राप्ती करत सुटलो ,
तरीही आयुष्यातील काही
स्वप्नांना मात्र मुकलो !!!!!

__ @अमोल K (अभ्युदय)



एकदाची तू मला दिसली
आणि बाल्कनीत येऊन बसली,
चहाचा एक घोट घेता घेता
तू मला जराशी नशीली वाटली !!!!

— @अमोल K (अभ्युदय)

तू मज दिसता,
मी फुलांसवे शब्द वाहिले..
अन तू मज पाहता,
मी निमिषात प्रेमरूपी युग पाहिले !

— @अमोल K (अभ्युदय)

तुझ्या सौंदर्याचा आलेख
क्षणोक्षणीं चढता असावं,
तुझ्यातील लावण्याने माझ्या
मनाला सतत भुरळ पाडावं..
किती समजाऊ आणि आवरु
माझीया मनाला,
नेहमीच वाटते पाहताक्षणी तुझ्या
प्रेमात पडावं ...

__@अमोल K (अभ्युदय)

आधीच मन होते अधीर,
त्यातच झाली तुझी लागीर..
पडता तुझ्या लावण्याचा सडा,
होईल मी तुझ्या प्रेमाचा फकीर !!!

— @अमोल K (अभ्युदय)

साद तू घालशील ,

प्रतिसाद मी देईल ..

अस्वस्थ तू होशील

अश्रू मात्र मी ढाळेल !

__ @अमोल K

(अभ्युदय)

एक हळुवार येणारी वाऱ्याची
झुळूक ,
मोहक सुवासाने मला आकर्षित
करत होती ..
अतिशय उत्कंठतेने मी तिचा शोध
घेत होतो ,
शेवटी कळले कि ती दुसरी -तिसरी
कोणी नसून ..
माझ्याच घराच्या खिडकीतील
कुंडीतून डोकावून ,
व मला हळूच पाहून तिच्या
सुंगंधाने मला आकर्षित करणारी ,
" रातराणी " होती !!!!!!!

__ @अमोल K (अभ्युदय)

तुला एकटक पाहिलं,
त्याचक्षणी मला सुचलं ..
तुझ्यातील सौंदर्याच्या
वलयाला ,
माझ्या शब्दांनी टिपलं !!!!!

__ @अमोल K (अभ्युदय)



वृत्ती एखाद्याला अनुकूल असू
शकते ,
परंतु चेहऱ्यावरचे स्मित नेहमीच
सर्वांसाठी अनुकूल असते

_ @अमोल (अभ्युदय)

स्पर्श...

आज पुन्हा एकदा तुझ्या स्पर्शाची
जाणीव झाली,
वेलीवरती मोगऱ्याची कळी खुलून
आली..
तुला भेटण्याची आस मनात दाटून
आली,
तुझ्या मिठीत येण्यास प्रेमरूपी
धुक्यांची गर्दी दाट झाली !!!

_ @अमोल K (अभ्युदय)

मी लिहितो ,
म्हणून तुम्ही वाचता ..
आणि तुम्ही वाचता ,
म्हणून मी लिहितो !!!!!

__ @अमोल K (अभ्युदय)

प्रा .डॉ . अमोल भा. कस्तुरे

@ अमोल K..(अभ्युदय)

Contact No:+91 - 7276093835

Email: amolia2004@gmail.com

https://www.facebook.com/onemanshow007